जुन्या रोजगार हमी योजनेची शासनमान्य यादीतील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी दि.३०/६/२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः रोहयो-२०१२/प्र.क्र. १०३/रोहयो-८**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

तारीख: १९ सप्टेंबर, २०१३.

**वाचा —**

१) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२००८/प्र.क्र. २८/रोहयो-६, दि. ३०/६/२००९.

२) शासन निर्णय क्र. मग्रारोहयो-२००८/प्र.क्र. २८/रोहयो-६, दि. २४/७/२०१०.

३) शासन निर्णय क्र. रोहयो-२०१०/प्र.क्र. ३३३/रोहयो-८, दि. १८/३/२०११.

४) शासन निर्णय क्रमांक: रोहयो-२०१२/प्र.क्र. १०३/रोहयो-८, दि. ३१/१०/२०१२

**प्रस्तावना —**

महाराष्ट्र राष्ट्रीय रोजगार हमी अधिनियम, २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना दि.१/४/२००८ पासून सर्व जिल्ह्यांत लागू झाली आहे. दि. १/४/२००८ रोजी जुन्या रोजगार हमी योजनेतील जी कामे अपूर्ण आहेत, त्याबाबतच्या याद्या संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास सादर केल्या होत्या. त्यावर शासन स्तरावर निर्णय घेऊन सदर कामे जुन्या रोजगार हमी योजनेप्रमाणे पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार संदर्भाधिन अनुक्र. १ ते ३ येथील दि.३०/६/२००९, दि. २४/७/२०१० व दि. १८/३/२०११ चे आदेश निर्गमित करण्यात आले. सदर आदेशांनुसार रस्त्याची एकूण ५७८६ एवढी कामे व पाझर तलावाची एकूण ४,३४९ एवढी कामे अशी एकूण १०,१३५ कामे पूर्ण करण्यास मान्यता दिली होती. सदर कामे ३ वर्षांचा कालबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करणे आवश्यक होते. ही मुदत दि. ३०/६/२०१२ पर्यंत होती. दरम्यान दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सदर कामे पूर्ण करण्यासाठी दि. ३०/६/२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या वाढीव मुदतवाढीमध्ये किती कामे पूर्ण झाली व किती कामे अपूर्ण आहेत याबाबतची माहिती सर्व विभागीय आयुक्त यांच्याकडून मागविण्यात आली होती. तसेच प्रधान सचिव (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२/८/२०१३ रोजी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त (रोहयो), कार्यकारी अभियंता व लेखा अधिकारी यांच्यासमवेत बैठक घेऊन आढावा घेण्यात आला. यामध्ये अजूनही काही कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. सदर कामातील अकुशल भाग पुर्ण झाला असून कुशल भाग शिल्लक राहिलेला आहे. या कामातील अकुशल भागावर शासनाचा निधी खर्च झालेला आहे. सदर निधी वाया जाऊ नये म्हणून ज्या अपूर्ण कामांना शासनाने

मान्यता दिलेली आहे, अशी अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्याची बाब विचाराधीन होती. वरील पार्श्वभूमीवर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय—**

अपूर्ण कामे पूर्ण करण्यास संदर्भिय शासन निर्णयानुसार दिलेल्या मान्यतेमधील रस्त्यांची एकूण ५७८६ व पाझर तलावांची एकूण ४३४९ अशा एकूण १०१३५ कामांमधील जी कामे दि. ३०/६/२०१३ रोजी अपूर्ण/शिल्लक आहेत फक्त तीच कामे जुन्या रोजगार हमी योजनेच्या पध्दतीनुसार पूर्ण करण्यास दि.३०/६/२०१४ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्याने त्यांच्याकडील शासनमान्य अपूर्ण कामांच्या यादीतील शिल्लक अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत कामनिहाय व महिनावार कृतिआराखडा तयार करावा व तो दिनांक ३० नोव्हेंबर,२०१३ पर्यंत शासनास सादर करावा. तसेच शासनास सादर केलेल्या आराखड्या नुसार विहित मुदतीमध्ये शिल्लक अपूर्ण कामे पूर्ण करावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201309191138152716. असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(व. कृ. पाटील)
उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री /राज्यमंत्री (रोहयो व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
उप सचिव, विधानमंडळ रोहयो समिती (४० प्रती)
सर्व मंत्रालयीन विभाग.
प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
सर्व उप सचिव/अवर उसचिव/कार्यासन अधिकारी (रोहयो प्रभाग)
निवड नस्ती, रोहयो-८